**प्रेस नोट** दिनांक :- ०३/०८/२०२६

**पवई पोलीस ठाणेस नोंद असलेल्या अपहरणासारख्या गंभीर स्वरूपाच्या गुन्हयातील चार आरोपीतांना अटक करून सदरचा गुन्हा २४ तासांच्या आत उघडकिस आणलेबाबत..**

फिर्यादी श्री. चेतन चंद्रकांत देवलकर वय २८ वर्षे, व्यवसाय :- फ्रिलान्सींग, रा.ठि. रूम नं. ५, अजिंक्यतारा सोनवणे चाळ, सुर्यानगर, एल.बी.एस. रोड, विक्रोळी, मुंबई हे व्यवसायाने फ्रिलान्सींगचे काम करीत असून फिर्यादीचे @relate_with_chetya1असे इन्स्टाग्राम अकाऊंट आहे. फिर्यादी हे सदर इन्स्टाग्राम अकाऊंटवर रिल बनवून टाकत असतात तसेच विविध प्रकारचे content तयार करतात. मागील आठ महिन्यांपासून इन्स्टाग्राम वरील निवडक प्रसिध्द Reel Creators हे बेटींग ॲप (चायनिज ॲप) डाऊनलोड करण्यासाठी लोकांना प्रोत्साहीत करीत असल्यामुळे सदरचा प्रकार चुकीचा असल्याने फिर्यादी हे त्यांच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून जनजागृतीसाठी Counter Reel तयार करीत होते . सदर बेटींग ॲप चे प्रमोशन फ्रिलान्सर प्रतिक शिंदे हा सुध्दा त्याच्या इन्स्टाग्राम अकाऊंट /pratiikshinde यावरून करत होता. प्रतिक शिंदे याने बेटींग ॲपच्या प्रमोशनकरीता केलेल्या रिल्स व स्टोरी यांना फिर्यादी यांनी Roast केले होते. मागील गेल्या ५ ते ६ महिन्यांपुर्वी अनिकेत नावाच्या अज्ञात इसमाने प्रतिक शिंदे याच्या बेटींग ॲपच्या प्रमोशकरीता करण्यात आलेल्या रिल्स व स्टोरीना Roast करू नको अशी इन्स्टाग्रामवर कॉल करून धमकी दिली होती. परंतु सदरचे बेटींग ॲप हे चुकीचे असल्याने फिर्यादी हे प्रतिक शिंदे याच्या रिल्स व स्टोरीना Roast करत राहीले. त्याचा राग प्रतिक शिंदे याने त्याच्या मनात धरला होता.

दिनांक २६/०७/ २०२६ रोजी साधारण १९.३० वा. च्या दरम्यान फिर्यादी पंचकुटीर पवई या ठिकाणी आले असता गुन्हयातील अटक आरोपीत नामे यश बाबरे हा त्यांच्या समोर आला. तो फिर्यादी यांना गोड बोलून त्याच ठिकाणी काही अंतरावर उभ्या असलेल्या काळया रंगाच्या स्कॉर्पिओ गाडीच्या डाव्या बाजूच्या दरवाजाजवळ घेवून आला. तेथे त्याने अचानक फिर्यादी यांची मान पकडून त्यास जबरदस्तीने गाडीच्या पुढील व मागील सिटच्या मधल्या जागेत ढकलले. त्यावेळी नमुद स्कॉर्पिओ मधील रंगाने सावळा असणाऱ्या इसमाने फिर्यादी यांचे तोड दाबण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या गळयावर पाय देवून चाकू काढून पोटात चाकू खुपसण्याची धमकी दिली. त्याचप्रमाणे सदर वेळी उपस्थित असलेल्या समीर कुचेकर उर्फ एस. के. याने हाताने मारहाण केली व तेथून ते फिर्यादी यांना स्कॉर्पिओ मध्ये घेवून पुढे निघून गेले. त्यानंतर गाडीमध्ये आधीच असलेल्या व गाडीमध्ये नंतर बसलेल्या दोन अनोळखी इसमांनी मिळून हाताने व लाथा बुक्क्यांनी मारहाण व शिवीगाळ केली. त्यानंतर सावळा रंग असलेल्या इसमाने फिर्यादी यांस लाकडी दांडक्याने मारहाण केली. त्यावेळी फिर्यादी यांच्या लक्षात आले कि, गाडीमध्ये रिलस्टार प्रतिक शिंदे हा गाडीच्या कोसीटवर व ५ ते ६ महिन्यांपुर्वी फिर्यादी यांना धमकी देणारा इसम नामे अनिकेत हा चालक म्हणून बसला होता. त्यावेळी ते फिर्यादी यांना मारहाण करतानाचे रिल तयार करीत असल्याचे फिर्यादी यांनी बघितले. काही वेळाने प्रतिक शिंदे फिर्यादी यांना म्हणाला कि, '' आमच्या बेटींग ॲपच्या विरोधात व्हिडीओ का बनवतोस? तुला जर ॲपचे प्रमोशन करायचे असेल तर कर, पण आमच्या विरोधात व्हिडीओ का बनवतोस '' त्यावेळी फिर्यादी यांनी ते त्यांच्या विरोधात रिल्स बणवणार नाहीत असे सांगितले. त्यानंतर साधारण १ तासानंतर साधारण २३.३५ वा. च्या सुमारास फिर्यादी यांना कळंबोली या ठिकाणी सोडले. नमुद वेळी फिर्यादी हे घाबरले असल्याने ते डॉक्टरोपचार करून दिनांक ०२/०८/२०२६ रोजी पवई पोलीस ठाणेस तक्रार देण्याकरीता आले असता त्यांचा जबाब नोंद करून यश बाबरे, प्रतिक शिंदे, अनिकेत गोडसे, समीर कुचेकर उर्फ एस.के व त्यांच्या सोबत असलेल्या इतर तीन अनोळखी इसमांविरोधात गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

नमुद गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने गुन्हयातील आरोपीत नामे यश बाबरे याचा त्याचे राहते परिसरात शोध घेवून त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आलेले आहे. त्याच्याकडे केलेल्या तपासादरम्यान गुन्हयातील आरोपीत नामे प्रतिक शिंदे, अनिकेत व समीर कुचेरकर यांना भिगवन पोलीस ठाणे, ता. इंदापुर, जि. पुणे या ठिकाणाहून गुन्हयात अटक करण्यात आलेले आहे. नमुद अटक आरोपीतांना मा. न्यायालयासमक्ष हजर करून त्यांचे पोलीस कोठडी दरम्यान गुन्हयाचा पुढील तपास करीत आहोत.

**गुन्हयात अटक करण्यात आलेल्या आरोपीतांची नावे :-**

**१) यश रणधीर बाबरे - सुर्यानगर विक्रोळी, मुंबई, २) प्रतिक राम शिंदे - भादलवाडी, इंदापुर जि. पुणे ,**

**३) अनिकेत राम गोडसे - फलटण सातारा , ४) समीर सुनिल कुचेकर उर्फ एस.के. - चिखली, जि. पुणे**

सदरची कामगिरी मा.श्री. देवेन भारती पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा.श्री. मनोजकुमार शर्मा पोलीस सह आयुक्त (का व सु) बृहन्मुंबई, मा.श्री. अभिनव देशमुख अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, मा.श्री. दत्ता नलावडे पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ - ३, मा.श्री. दादासाहेब घुटुकडे सहाय्यक पोलीस आयुक्त, साकिनाका विभाग व मा.श्री. आत्माजी सावंत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पवई पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सुशांत बडगर पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. संदीप चव्हाण पोलीस निरीक्षक तसेच सपोनि श्री माने व गुन्हे प्रकटीकरण पथक यांनी पार पाडली आहे.